महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ २९ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १२३ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना 11 हजार कोटींचे वितरण येत्या पंधरा दिवसांत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठी जवळपास 32 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. यात आतापर्यंत 8 हजार कोटी रुपयांचे अर्थसहाय वितरित करण्यात आले असून, याचा लाभ 40 लाख शेतकऱ्यांना होतो आहे. आणखी 11 हजार कोटी रुपये वितरित करण्यास आज मंत्रिमंडळ बैठकीत विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले. ही मदत पुढच्या 15 दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री फडणवीस माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे. त्यांना सर्वतोपरी मदत केली जात आहे. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत आणखी 11 हजार कोटी रुपये वितरीत करण्यास मान्यता देण्यात आल्याने मदतीसाठी निधीची कुठलीही कमतरता नाही. पुढील 15 दिवसांत ही मदत अतिवृष्टग्रस्त जिल्ह्यातील किमान 90 टक्के शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यापूर्वी जशा याद्या मिळाल्या, तसा निधी वितरित करण्यात आला. ज्यांना केवळ दोन हेक्टरसाठी मदत मिळाली आहे, त्यांना पुढील हेक्टरसाठीचे अर्थसहाय्य दिले जाणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, काही शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये तांत्रिक अडचणी आहेत, तर काहींच्या नोंदींमध्ये त्रुटी आहेत. काही ठिकाणी एकापेक्षा जास्त खाती असल्याचे दिसून आले. या सर्व बाबी तपासून उर्वरित 10 टक्के



शेतकऱ्यांपर्यंतही तातडीने मदत पोहोचण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. कुणीही पात्र शेतकरी मदतपासून वंचित राहू नये व अपात्र खातेधारकांच्या खात्यावर निधी जावू नये, यासाठी ई-केवायसी केली जात आहे. ॲग्रीस्टॅकचा डेटा राज्य शासनाकडे असून यामध्ये ज्या शेतकऱ्यांची माहिती उपलब्ध आहे. त्यांची पुन्हा ई-केवायसी केली जात नसून सहायता निधी थेट त्यांच्या खात्यात जमा केला जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

### शेतमालाच्या विक्रीसाठी नोंदणी करा

शेतमालाच्या खरेदीसाठी राज्यात नोंदणी सुरू केली जात असून यासाठी नोंदणी करण्याचे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. अशा नोंदणीमुळे पारदर्शकता आली असून आता शेतकऱ्यांना हमी भाव मिळत आहे. यापूर्वी व्यापारी शेतकऱ्यांकडून कमी दराने माल घेवून शासनाला जास्त दराने विकला जात असे. नोंदणी करून शासकीय खरेदी केंद्रावर किंवा शासनाने जाहीर केलेला हमी भावाप्रमाणे खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांनाच मालाची विक्री करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले आहे.

## लक्षवेधी

## कल्याण डोंबिवलीत वाढले प्रदूषण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली शहरात देखील नागरिकांनी मोठ्या उत्साहात फटाक्यांची केल्या आतषबाजीमुळे हवा प्रदूषणात वाढ झाल्याने वाढत्या प्रदूषणाने नागरिकांना श्वसनाच्या आजाराची लागण झाली घसा खवखवणे, खोकला तसेच सर्दी आदी साथीचे आजाराने नागरिक बेजार झाले आहेत, तर दुसरीकडे कल्याण डोंबिवली शहर हवा प्रदूषणामुळे 'अस्वच्छ' श्रेणीत पोहोचली असून शहरातील वायू गुणवत्तेचा निर्देशांक तब्बल २५० (एक्यूआय) इतका नोंदवला गेला आहे.

दिवाळीत फोडल्या जाणाऱ्या फटाक्याच्या आतषबाजीमुळे फटाक्याचा पसरणारा धुरामुळे गेल्या काही दिवसापासून हवा प्रदूषणात वाढ झाल्याने हवा गुणवत्तेमध्ये घसरण झाली. शांत वाऱ्यामुळे आणि हवेचा प्रवाह मंद असल्याने फटाक्यांचा व वाहनांचा धूर वातावरणात अडकून राहिला. परिणामी, सूक्ष्म प्रदूषणकण (पीएम २.५) यांची घनता वाढली आणि हवेची गुणवत्ता झपाट्याने खालावली. दिवाळीमध्ये मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतषबाजी केली गेल्याने फाटक्याचा धूर हवेत धूळ स्वरूपात बराच काळ राहतात. त्यामुळे श्वसना संबंधित श्वसन नलिका, फुप्फुस आणि दम्याचा विकार, शिंका येणे, नाक गळणे, डोकेदुखी यासारखे आजार पसरू लागल्याने डॉक्टर मंडळीकडे संबंधित आजारांच्या रुग्णाची उपचारासाठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

## आदिवासी मोर्चा पाचपाखाडी ते माजिवडापर्यंत वाहतूक कोंडी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे ::** ठाणे येथून मुंबईच्या दिशेने निघालेल्या आदिवासी मोर्चामुळे पूर्व द्रूतगती महामार्गावर पाचपाखाडी ते माजिवडा पर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. मोर्चामुळे ठाण्याहून मुंबईत कामानिमित्ताने वाहनाने निघालेल्या नोकरदारांना वाहतुक कोंडीचा फटका सहन करावा लागला. माजिवडा ते कोपरी हे १० ते १५ मिनीटांचे अंतर कापण्यासाठी चालकांना पाऊण तास लागत होता. महामार्गावरील कोंडी टाळण्यासाठी काही चालकांनी ठाण्यातील अंतर्गत मार्गाचा पर्याय निवडला. त्यामुळे अंतर्गत मार्गावर भार वाढून या मार्गावरही कोंडी झाली होती.

नाशिक येथून सकल आदिवासी विकास या संस्थेने विविध मागण्यांसाठी मुंबई पर्यंत मोर्चा काढला होता. हा मोर्चा पूर्व द्रुतगती महामार्गावर आल्यानंतर सोमवारी रात्री आणि मंगळवारी सकाळी मोठ्याप्रमाणात वाहतुक कोंडी झाली होती. घोडबंदर, भिवंडी, ठाणे शहराच्या मध्यवर्ती भागातून हजारो नागरिक पूर्व द्रूतगती महामार्गाने मुंबई गाठतात. परंतु मोर्चामुळे मंगळवारी सकाळी पाचपाखाडी ते माजिवडा पर्यंत वाहतुक कोंडी झाली होती.

## कोकणातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्या

### आमदार किसन कथोरेंची मुख्यमंत्री फडणवीसांकडे मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई:** ठाणे जिल्ह्यासह संपूर्ण कोकण विभागात अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, या शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसान शंकर कथोरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे केली आहे. कथोरे यांनी या संदर्भात दोन स्वतंत्र पत्रे पाठवून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याची तत्काळ कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

ठाणे जिल्ह्यासह कोकण किनारपट्टीवरील रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग आणि पालघर या जिल्ह्यांत गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस आणि अवकाळी पर्जन्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. अनेक भागांमध्ये पिकं पाण्याखाली गेली असून, भात, नागली, वरई, फळबागा, भाज्या आणि इतर पिकांवर पूर आणि आर्द्रतेचा गंभीर परिणाम झाला आहे.

आमदार कथोरे यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, “अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांची उभ्या पिकांची स्थिती बिकट झाली आहे. कष्टाने उभे केलेले पीक हातातून जात असून शेतकरी आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त होत आहेत. शासनाने या नुकसानीचा तातडीने पंचनामा करून योग्य नुकसानभरपाई द्यावी.”

कथोरे यांनी नमूद केले आहे की, ऑक्टोबर 2025 महिन्यातील 19 ते 25 ऑक्टोबर या कालावधीत ठाणे आणि कोकण प्रदेशात अतिवृष्टी झाली. या अवकाळी पावसामुळे पिके जमिनीतच सडू लागली आहेत आणि उत्पादनाचा दर्जाही खराब झाला आहे.


यामुळे शेतकऱ्यांच्या हातात काहीच उत्पन्न शिल्लक राहिले नाही. अनेक भागांतील शेतकरी कर्जबाजारी झाले असून, उपजीविकेचे साधनही हरपले आहे. “शासनाच्या कृषी विभागाने तातडीने प्रत्येक तालुक्यातील नुकसानग्रस्त भागांचे सर्वेक्षण करावे आणि पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्यावी,” अशी ठाम मागणी कथोरे यांनी पत्रात केली आहे.

त्यांनी असेही नमूद केले की, कोकणातील शेती हा निसर्गावर अवलंबून असलेला व्यवसाय आहे. अशा परिस्थितीत सलग झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मानसिक आरोग्य आणि आर्थिक स्थैर्य दोन्ही डळमळीत झाले आहे. सरकारने तातडीने हस्तक्षेप करून दिलासा दिला नाही, तर पुढील हंगामासाठी शेतकरी बी-बियाणं विकत घेण्याच्या स्थितीत राहणार नाहीत.

कथोरे यांनी पत्रात नमूद केले आहे की, या वर्षीच्या अवकाळी पावसामुळे भातपीक तर नुकसानग्रस्त झालेच आहे, पण फळबागा, भाज्यांचे पीक आणि पशुपालनावरही गंभीर परिणाम झाला आहे. त्यामुळे राज्य शासनाने तातडीने कृषी विमा कंपन्यांशी समन्वय साधून विमा दावे जलदगतीने निकाली काढावेत आणि शेतकऱ्यांना थेट बँक खात्यावर मदत जमा करावी, अशी त्यांनी मागणी केली आहे.

या पत्रांद्वारे आमदार कथोरे यांनी ठाणे जिल्हा प्रशासनासोबतच कोकणातील इतर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनाही मदत देण्यात यावी, अशी मागणी केली आहे. त्यांनी नमूद केले की, “माझ्या मुरबाड विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण ठाणे जिल्हा आणि कोकण परिसरात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शासनाने नुकसानग्रस्त भागात तातडीने पंचनामे करून योग्य नुकसानभरपाई देण्याचे आदेश द्यावेत.”

कथोरे यांनी पुढे म्हटले की, ‘अवकाळी पावसामुळे कोकणातील शेतकऱ्यांचे जगणेच कठीण झाले आहे. अशा वेळी सरकारने संवेदनशीलता दाखवून तातडीने मदतीचा निर्णय घ्यावा.’आमदार कथोरे यांनी आपल्या पत्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना या संदर्भात तातडीने बैठक घेऊन संपूर्ण कोकण विभागासाठी मदत पॅकेज जाहीर करण्याचे आवाहन केले आहे.



## मुंबईत 'क्लायमेट वीक'चे आयोजन

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** वातावरणीय बदल आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात भारताचे नेतृत्व अधोरेखित करणारी मुंबई वातावरण सप्ताह - ‘मुंबई क्लायमेट वीक’ ही जागतिक स्तरावरील परिषद पुढच्या वर्षी फेब्रुवारीमध्ये मुंबईत होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

हा महत्त्वाकांक्षी उपक्रम ‘प्रोजेक्ट मुंबई’ या संस्थेच्या संकल्पनेतून साकारला जात असून महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. मंत्रालयातील समिती कक्षात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी या उपक्रमाची घोषणा केली. यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे, महापालिका आयुक्त भूषण गगराणी, विभागाच्या सचिव जयश्री भोज, प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी आदी उपस्थित होते.

विकसनशील देशांतील वातावरणीय बदल, अन्न व ऊर्जा टंचाईच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून विकास आणि पर्यावरणीय कृती यांच्यात संतुलन साधण्यासाठी तो प्रभावी भूमिका बजावेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.मुंबई क्लायमेट वीकचा मुख्य कार्यक्रम १७ ते १९ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे पार पडेल. त्याचबरोबर या कार्यक्रमात नागरिकांना सहभागी होता यावे, यासाठी शहरभर विविध प्रदर्शने, कार्यशाळा, चित्रपट, कला, क्रीडा, आरोग्य आणि अध्यात्म यांच्याशी निगडीत उपक्रम, आणि क्लायमेट फूड फेस्टिव्हल सारखे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या परिषदेत ग्लोबल साऊथमधील ३० पेक्षा अधिक देशांमधील प्रतिनिधी सहभागी होणार असून यामध्ये व्यवहार्य असा हवामान बदल कृती कार्यक्रम तयार करण्यात येईल. विशेष म्हणजे हा कार्यक्रम राज्यांचे मुख्यमंत्री, विविध शहरांचे प्रतिनिधी, उद्योग, सामाजिक संस्था, विद्यार्थी आणि युवक यांच्या सहभागातून तयार करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली. यावेळी फडणवीस यांच्या हस्ते मुंबई क्लायमेट वीकच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. तसेच या उपक्रमाची चित्रफीत यावेळी दाखविण्यात आली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई हवामान सप्ताह कृतीसह नेतृत्व करण्याच्या भारताच्या दृढनिश्चयाचे प्रदर्शन करतो. माननीय पंतप्रधानांनी ठरवलेल्या दृष्टिकोनातून प्रेरित होऊन, मुंबई आणि महाराष्ट्र जागतिक दक्षिणेसाठी न्याय्य, नाविन्यपूर्ण, चांगल्या निधीसह हवामान भविष्य घडवण्यास मदत करण्यास तयार आहेत.ग्लोबल साउथमधील वातावरणीय कृती आणि सहकार्य या क्षेत्रामधील भारताचे नेतृत्व सिद्ध करणारे मुंबई क्लायमेट वीक हे मोठे व्यासपीठ ठरणार आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईत पहिल्यांदाच "मुंबई क्लायमेट वीक" कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. आता कृती करण्याची वेळ आली आहे. यासाठी आपण समाजातील प्रत्येक व्यक्तीला, प्रत्येक व्यवसायाला आणि जीवनाच्या सर्व स्तरांना हवामान बदलाच्या परिणामांविरुद्ध मोहिमेत सहभागी व्हावे लागणार आहे. तसेच त्यांना कृतींद्वारे बदल कसे कमी करायचे हे प्रत्यक्षात सांगावे लागणार आहे."मुंबई क्लायमेट वीक" कार्यक्रम आयोजित केल्यानंतर आपल्याला महाराष्ट्र आणि मुंबईसाठी बेंचमार्क देखील निश्चित करावे लागतील, हवामान बदलाच्या क्षेत्रात कृती करण्यासाठी काही ध्येये निश्चित करावी लागतील. त्यासाठी आजपासून कृती सुरू करूया असेही ते म्हणाले.तीसहून अधिक देशांमधील अभ्यासक, पर्यावरण तज्ज्ञ, आणि धोरणकर्ते मुंबई क्लायमेट वीकच्या व्यासपीठावर एकत्र येऊन वातावरणीय बदलावरच्या सर्वंकष आणि व्यवहार्य उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न करतील. हा उपक्रम भारत आणि विकसनशील राष्ट्रांचा आवाज जागतिक स्तरावर पोहोचविणारा ठरेल, असेही ते म्हणाले.मुंबई क्लायमेट वीकचा भर अन्न प्रणाली, ऊर्जा संक्रमण आणि शहरी सक्षमता या तीन प्रमुख विषयांवर असेल. न्याय, नवोन्मेष आणि वित्तीय दृष्टीकोनातून हे विषय सखोलपणे मांडले जातील.‘प्रोजेक्ट मुंबई’चे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी यांनी कार्यक्रमाबद्दल माहिती देताना सांगितले की, “मुंबई क्लायमेट वीक हा महाराष्ट्र आणि भारतासाठी एक ऐतिहासिक टप्पा असणार आहे. वातावरणीय बदलाला तोंड देण्यासाठी लोकसहभागावर आधारित असे शाश्वत आणि समावेशक उपाय या परिषदेतील मंथनातून तयार होतील.”

या उपक्रमाचे नॉलेज पार्टनर मॉनिटर डिलॉईट असणार असून क्लायमेट ग्रुप, इंडिया क्लायमेट कोलॅबोरेटिव्ह, वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट (इंडिया), एव्हरसोर्स, एचटी पारेख फाउंडेशन, युनिसेफ, शक्ती फाउंडेशन, रेनमॅटर फाउंडेशन, नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट आणि राष्ट्रीय सेवा योजना यासारख्या संस्था यात सहभागी होणार आहेत.मुख्यमंत्री कार्यालयातील अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार कौस्तुभ धवसे, प्रोजेक्ट मुंबईचे सल्लागार मंडळ सदस्य रिधम देसाई, जलज दाणी आदी यावेळी उपस्थित होते.

## महाराष्ट्रात ज्येष्ठ नागरिकांचे पदभ्रमण

### पदभ्रमणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली -** चालण्याचा ध्यास घेतलेले डोंबिवलीतील ७३ वर्षाचे सेवानिवृत्त बँकर विद्याधर भुस्कुटे आता चौथ्यांदा पदभ्रमणाला निघाले आहेत. यावेळी ते जल, वन संवर्धनाचा संदेश देत महाराष्ट्रातील २७ जिल्ह्यांमधून तीन हजार १२५ किलोमीटरचे पदभ्रमण करणार आहेत. चार महिने ही पायी भ्रमंती असणार आहे.

३१ ऑक्टोबर रोजी डोंबिवलीतील सावळाराम महाराज क्रीडासंकुल येथील कॅप्टन विनयकुमार सचान स्मारक येथून सकाळी साडे सात वाजता या पदभ्रमणाचा शुभारंभ होणार आहे. या पदभ्रमणामध्ये २७ जिल्ह्यांमधील दुष्काळग्रस्त, अवर्षणग्रस्त भागांना सर्वाधिक प्राधान्य देण्यात आले आहे. आरोहण या संस्थेने या पदभ्रमंतीचे नियोजन केले आहे.

जल आणि वनसंवर्धना बरोबर देशात, राज्यात शांती, मानवता, भृणहत्या प्रतिबंध, मूल्याधिष्ठीत शिक्षण व्यवस्थेचा संदेश या पदभ्रमंतीमधून विद्याधर भुस्कुटे राज्याच्या विविध भागातील नागरिक, शाळकरी, महाविद्यालयीन मुले, सामाजिक, उपक्रमशील संस्था कार्यकर्ते, पदाधिकारी यांना देणार आहेत. चालुया महाराष्ट्र हे शीर्षक घेऊन ही पदयात्रा काढली जात आहे. ३१ ऑक्टोबरपासून भ्रमंतीला निघालेले भुस्कुटे २४ फेब्रुवारीपर्यंत पुन्हा डोंबिवलीत परतणार आहेत. ही पदभ्रमंती पालघर, नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव, बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, वाशीम, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड आणि ठाणे जिल्ह्यांमधून होणार आहे.








# ओला-उबरच्या जाचातून प्रवाशांची होणार सुटका

OLA-UBER या प्रायव्हेट टॅक्सीच्या जाचातून आता प्रवाशांची सुटका होणार आहे. खाजगी टॅक्सी चालकांच्या अरेरावीला रोखण्याची आता वेळ आल्याचे म्हटले जात आहे. भाड्याच्या नावाने अनेक छुपे चार्जेस लावण्याच्या खाजगी टॅक्सींचा अंत आता जवळ आल्याने म्हटले जात आहे. कारण आता देशातील पहिली सहकारी टॅक्सी सेवा Bharat Taxi नावाने सुरु होणार आहे.

भारत टॅक्सीचा पहिला पायलट प्रोजेक्ट सर्वात आता नोव्हेंबरपासून दिल्ली येथून सुरु होणार आहे. ६५० चालकांसह या सेवेचा पहिला फेज सुरु होत असून यात महिला सारथी देखील असणार आहेत. त्यानंतर डिसेंबर महिन्यापासून देशभरातील इतर राज्यात या टॅक्सी सेवेचा विस्तार होणार आहे.चला पाहूयात काय आहे योजना...

राष्ट्रीय सहकारी राईड हेलिंग प्लॅटफॉर्म 'भारत टॅक्सी' ही एक सरकारी कॅब सर्व्हीस असून यास सहकार मंत्रालय आणि राष्ट्रीय ई-गर्व्हनन्स डिव्हीजनने तयार केले आहे. यात ड्रायव्हरना देखील मालकी हक्क असणार आहे. यासाठी सहकार टॅक्सी कॉ -ऑपरेटीव्ह लिमिटेड सोबत अलिकडेच करार करण्यात आला आहे. हे सदस्यता आधारित मॉडेल आहे. ज्याला सहकार टॅक्सी को-ऑपरेटीव्ह लिमिटेड चालवणार आहे.अमुल डेअरी जशी चालते त्या धर्तीवर ही सहकार टॅक्सी चालणार आहे. याची स्थापना जूनमध्ये ३०० कोटी रकमेसह झाली आहे.

या सेवेच्या संचालन समितीचे चेअरमन आहेत अमूलचे एमडी जयेन मेहता. एनसीडीसीचे उपप्रबंधक निदेशक रोहित गुप्ता व्हाईस चेअरमन आहेत. भारत टॅक्सीचे ऐप नोव्हेंबरपासून डाऊनलोड करता येतणार आहे. आधी हे ऐप हिंदी, गुजराती, मराठी आणि इंग्रजीत असणार आहे. डिसेंबर ते मार्च २०२६ पर्यंत राजकोट, मुंबई, पुणे येथे सेवा सुरु होणार आहे. एप्रिल ते डिसेंबर दरम्यान लखनऊ,भोपाळ, जयपूर येथे सुरुवात होणार आहे. २०२७-२८ मध्ये २० शहरांमध्ये आणि २०२८-३० दरम्यान जिल्हा मुख्यालये, गावातही या सेवेचा विस्तार होणरा आहे.

· डायनामिक प्रायझिंग, पिक प्रायझिंग, मान्सून प्रायझिंग, हिवाळा प्रायझिंग, उन्हाळा प्रायझिंग, गाडी उपलब्ध नाही प्रायझिंग या सर्वांमधून सुटका होणार आहे. फिक्स आणि वाजवी भाडे असणार आहे.

· कॅब सेफ्टी मोठा मुद्दा असल्याने भारत टॅक्सी या पोलिस ठाण्याशी इंटेग्रेशन असतील. डिस्ट्रेस बटणाची सुविधा असेल संकटात पॅनिक बटण दाबल्यास जवळच्या पोलिस ठाण्यास माहिती मिळणार आहे.

· ड्रायव्हरकडून कमिशनच्या जागी सदस्यता शुल्क घेतले जाईल, दर राईड

**परदेशी कंपन्याला तोंड देण्यासाठी भारताची 'भारत टॅक्सी' सेवा सुरु होणार**

मागे १०० टक्के कमाई ड्रायव्हरला मिळेल. त्यांना केवळ दैनिक, साप्ताहिक वा मासिक शुल्क द्यावे लागणार आहे.

· महिला 'सारथी' म्हणजे महिला ड्रायव्हर्सचा देखील समावेश असणार आहे. पहिल्या टप्प्यात १०० महिला ड्रायव्हर सेवेत असतील साल २०३० पर्यंत त्यांची संख्या १५ हजार होणार आहे.

**वाचक मनोगत**

## लोकप्रतिनिधींची शैक्षणिक पात्रता

सर्व प्रसार माध्यमे लोकप्रतिनिधींना विविध कारणास्तव प्रकाश झोतात आणत असतात परंतु निवडून आलेल्या सर्वच लोकप्रतिनिधींची ओळख शैक्षणिक पात्रतेसह वाचकांना करून देणे महत्त्वाचे आहे काही उमेदवार एसएससी उत्तीर्ण आहेत त्यांना कायद्याचे आकलन कसे होणार व सरकारी कारभारात ते काय मदत करणार? यांचा उद्योग विरोध करणे, बंद पुकारणे किंवा उपोषणाची स्टंटबाजी करणे आणि प्रसिद्धी मिळवणे एवढाच आहे,आणि असतो. खासदार,आमदार, नगरसेवक किमान पदवीधर तरी हवा. निवडणूक आयोग याचा गंभीरपणे विचार करेल का आज काल पैशाच्या जोरावर कोणीही निवडणूक लढवतो व निवडून येऊन हौसे गवसे निवडणुकीचा जुगार खेळून खुर्ची अडवून बसतो. रोजंदारी कामगारांसारखे मुख्यमंत्री बदली होत असतात बहुतांशी शासकीय नोकरीसाठी किमान पदवीधर/ संगणकाचे ज्ञान तरी असावे लागते मग जबाबदार लोकप्रतिनिधींसाठी तशी शैक्षणिक पात्रतेची अट का नसावी?

**- सुनिल इंगळे, खडकपाडा,कल्याण.**

# गणेश मंदिर संस्थानमध्ये मंदिरांच्या फोटोंचे प्रदर्शन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : सांस्कृतिक शहर डोंबिवली मधील प्रसिद्ध गणेश मंदिर संस्थान मध्ये अद्वितीय मंदिरांच्या फोटोचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. दिनांक 27 ऑक्टोबर ते 30 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी दहा ते रात्री आठ वाजेपर्यंत हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले आहे. कै.मोरेश्वर कुंटे यांनी आपल्या बजाज एमएटी वरून महाराष्ट्र भ्रमण करताना 18 हजार मंदिरांपैकी आगळयावेगळया अद्भुत फोटोंचे व तरंगणाऱ्या तसेच विविध ध्वनी निर्माण करणारे, गाणारे, पाषाणही या प्रदर्शनात पहावयास मिळतील.

विश्व हिंदू परिषद आणि मंदिर कोश यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रदर्शनाचे



आयोजन केले असून प्रदर्शनास रसिकांनी मोठ्या संख्येने भेट द्यावी असे आवाहन प्रभाकर कुंटे यांनी केले आहे. यावेळी विश्व हिंदू परिषद जिल्हा अध्यक्ष अजित तावडे, गणपती मंदिर देवस्थान विश्वस्त श्रीपाद कुलकर्णी तसेच धर्माचार्य संपर्क प्रमुख सतिश महानूर आदी मान्यवर उपस्थित होते.

# कल्याण पश्चिमेत 'वंदे मातरम'चा उत्सव साजरा करणार - माजी आमदार नरेंद्र पवार

## "पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'मन की बात'मधून संस्कृत, संस्कृती आणि सेवेचा जागर "

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : भारताचे राष्ट्रगीत वंदे मातरम् ला यंदा 150 वर्षे पूर्ण होत असून त्यानिमित्त संपूर्ण देशभरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याच्या आवाहनाला प्रतिसाद देत माजी आमदार नरेंद्र पवार यांनी कल्याण पश्चिममध्ये वंदे मातरम् उत्सव साजरा करण्याचे जाहीर केले आहे. तसेच कल्याणातील प्रत्येक नागरिकानेही आपापल्या स्तरावर या राष्ट्रगीताला अभिवादन करण्याचे आवाहनही नरेंद्र पवार यांनी यावेळी उपस्थितांना केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी प्रसारित झालेल्या 'मन की बात' कार्यक्रमात संस्कृत भाषेचे पुनरुज्जीवन, सोशल मीडियावरील तरुणांचे योगदान आणि आदिवासी वीरांच्या पराक्रमांचा उल्लेख करत देशवासीयांशी



संवाद साधला. कल्याण पश्चिमेतील भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या पुढाकाराने जनसंपर्क कार्यालयात आयोजित सार्वजनिक प्रक्षेपणाला नागरिकांचा उत्स्फूर्त

**माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या कार्यालयात झाले सार्वजनिक प्रक्षेपण**

प्रतिसाद मिळाला. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी जीएसटी बचत उत्सव, ऑपरेशन सिंदूर, स्वदेशी वस्तू आणि आत्मनिर्भर भारत याबाबत देशवासीयांना संबोधित केले.

देशाचे राष्ट्रगीत असलेले 'वंदे मातरम्' या गीताला यंदा 7 नोव्हेंबर रोजी दीडशे वर्षे पूर्ण होत आहेत. हे केवळ एक गीत नाही, तर ते एक ऊर्जास्रोत आहे ज्याने कोट्यवधी भारतीयांना देशभक्तीच्या भावनेने प्रेरित केले आहे. आजही हे गीत आपल्याला राष्ट्रसेवेची आणि मातृभूमीप्रती निष्ठेची जाणीव करून देत आहे. त्यामुळे या राष्ट्रगीताच्या सन्मानार्थ संपूर्ण देशभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी केले. हॅशटॅगवंदे मातरम् 150 या नावाने देशातील जनतेने आपल्याला यासंदर्भातील सूचना पाठवण्यासह त्यांनी यावेळी सांगितले. तर सणासुदीच्या काळात बाजारात स्वदेशी वस्तूंच्या खरेदीत मोठी वाढ झाली असून ही सुखद गोष्ट असल्याची भावनाही मोदी यांनी यावेळी व्यक्त केली.

# महाराष्ट्र राज्य अनुसूचीत जाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांची भिवंडी महानगरपालिकेस भेट

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : महाराष्ट्र राज्य अनुसूचीत जाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा) ॲड धर्मपाल मेश्राम यांनी आज दुपारी मंगळवार भिवंडी महानगरपालिकेच्या नियोजीत दौरा कार्यक्रम अंतर्गत महापालिका आयुक्त अनमोल सागर यांची भेट व बैठक घेऊन महापालिकेच्या विविध प्रशासकीय विभाग कामाचा आढावा घेतला.

यावेळी पालिका अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके,उपायुक्त विक्रम दराडे यांच्यसह पालिकेचे विविध विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.या बैठकीमध्ये मेश्राम यांनी महानगरपालिकेचा एकुण अर्थसंकल्प, त्यामधुन बांधील खर्च वजा करता उर्वरीत महसुली जमा रक्कमेमधून ५ टक्के दुर्बल घटकांसाठी किती निधीची तरतुद करण्यात आली आहे, याचा



आढावा घेतला.वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत शहरातील १३७ खाजगी रुग्णालयांच्या परवान्यांचे नुतनीकरण करण्यात आले असून, त्यापैकी किती रुग्णालयांमध्ये दुर्बल घटाकांसाठी खाटा राखीव ठेवण्यात आल्या आहेत याचा अहवाल एक महिन्याच्या आत अनुसूचित जाती आयोगास सादर करण्याच्या सूचना मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. संदिप गाडेकर यांना दिल्या आहेत. तर महिला व बाल कल्याण विभागामार्फत दिव्यांग,दुर्बल घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती घेतली. पालिकेच्या सर्व कर्मचाऱ्यांचे विशेषत: सफाई कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तक तातडीने अद्ययावत करुन त्याबाबतची यादी १५ दिवसात आयोगास सादर करण्याच्या सूचना आस्थापना विभागप्रमुख यांना दिल्या.बैठकीचा समारोप करताना आयोगाचे उपाध्यक्ष यांनी बैठकीचा उद्देश नमूद करताना शहरातील दुर्बल घटक व अनुसूचीत जातीच्या घटकांना विविध लाभ उपलब्ध करुन देणे. त्यांना न्याय देणे हे, आपले सर्वांचे आद्य व प्रथम कर्तव्य आहे. या घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणुन त्यांचा विकास करणे ही आपली प्राथमिक जबाबदारी असल्याचे स्पष्ट केले. महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक अनमोल सागर यांनी उपाध्यक्ष मेश्राम यांचे स्वागत करीत आभार व्यक्त केले.

# सरळसेवेत लिपिक टंकलेखक भरती




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील लिपिक टंकलेखक (गट क) एकूण 72 पदांकरीता फक्त माजी सैनिक उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. वरील पदांपैकी 01 पद हे अपंग संवर्गातून किमान 40% अपंगत्व असलेल्या उमेदवारामधून दिव्यांगत्वाच्या प्रकारांनुसार कर्तव्ये व जबाबदारीचा विचार करुन गुणवत्ता/उपलब्धतेनुसार भरण्यात येईल.

ही भरती प्रक्रिया टिसीएस-आयओएन यांच्यामार्फत होणार आहे. या परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. पात्र उमेदवारांना वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर Recruitment Tab येथे दि.14 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी 11 वाजल्यापासून (Resources Tab -> दि.05 नोव्हेंबर 2025 रोजी संध्याकाळी 23.59 वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतर ही वेबलिंक बंद होईल, असे ठाणे/पालघर जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर प्रांजळ जाधव (निवृत्त) यांनी कळविले आहे.

# कल्याण पूर्वेत भाजपातर्फे छठ पूजेचे आयोजन



**विविध घाट आणि तलावांवर भाविकांची पूजा**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण-डोंबिवली परिसरात छठ उत्सव मोठ्या भक्ती आणि उत्साहात साजरा केला जात आहे. शहरातील विविध घाट आणि तलावांवर भाविकांनी पूजा केली, सूर्यास्ताच्या वेळी मावळत्या सूर्याला जल अर्पण केले. कल्याण पूर्वेत देखील भारतीय जनता पार्टीच्या वतीने मोठ्या उत्साहात छट पूजा साजरी करण्यात आली. भारतीय जनता पार्टीचे कल्याण पूर्व विधानसभा निवडणूक प्रमुख तथा माजी परिवहन सदस्य संजय मोरे यांच्या वतीने छठ पूजेसाठी व्यापक तयारी केली. यंदा या छट पूजा उत्सवाचे पाचवे वर्ष होते.

पारंपारिक पोशाख परिधान केलेल्या महिला पूजास्थळांवर पोहोचल्या आणि गाणी आणि स्तोत्रांसह धार्मिक वातावरण निर्माण केले. सकाळी सूर्योदयाच्या वेळी, भाविक उगवत्या सूर्याला जल अर्पण करून छठ उत्सवाची सांगता करतील. भाजपाच्या वतीने आयोजित या छट पूजा उत्सवाला कल्याण पूर्वच्या आमदार सुलभा गायकवाड यांनी देखील उपस्थिती दर्शवित छट पूजा करत नागरिकांना शुभेच्छा दिल्या. याठिकाणी नागरिकांना पूजा करण्यासाठी स्वच्छ आणि सुंदर वातावरणात व्यवस्था करण्यात आल्याची माहिती संजय मोरे यांनी दिली.

यावेळी आमदार सुलभा गायकवाड, मंडळ अध्यक्ष विजय उपाध्याय, माजी परिवहन सभापती सुभाष म्हस्के, दीपक गायकवाड, मनोज पांडे, वंदना मोरे, यशोदा माळी, शैला वाणी, अंजू सिंग,सविता देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

# रिल्सपेक्षा रियल जीवन जगा

## - हभप हरिदास महाराज पालवे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : जगद्गुरु श्री तुकाराम महाराजांचे शब्दाला देवत्व प्रतिपादित करणारे अभंगाचे माध्यमातून शब्द हाच देव आहे. वेदापासून उपनिषद, रामायण, ज्ञानेश्वरी संतांचे सगळे शब्द हे मानवी जीवनाचे उत्कर्ष साधणार आहेत. हे सगळे शब्द अंतिम मानवी जीवनाला शांती, समाधान व मानवतेकडे घेऊन जाणारे असल्यामुळे ते शब्द मानव जातीने नक्कीच अभ्यासावेत. भविष्यात तरुण, तरुणींनी रिल्सच जीवन जगण्यापेक्षा रियलचं जीवन जगावं.पण जेणेकरून जीवनामध्ये कोणते कॉम्प्लेक्स तयार होणार नाहीत. मानवी जीवन जगण्यात सुकर वाटेल. भगवंताने दिलेल्या नरदेहाचे जीवन इतके गोड व सुंदर आहे. हि सौंदर्यदृष्टी प्रत्येकामध्ये आली तर हे जीवन दुःखमय वाटणार नाही. आणि जीवनाचा प्रवास अत्यंत सुखकर वाटेल. याकरता सतकर्म हे अत्यंत महत्त्वाचे आहे. असे प्रतिपादन ह.भ.प. हरिदास महाराज पालवे शास्त्री यांनी अखंड हरिनाम सप्ताह मध्ये भाविकांना संबोधिताना केले.

श्री जगद्गुरु तुकाराम महाराज सेवा मंडळ यांच्या वतीने दिनांक 25 ऑक्टोबर 2025 ते दि. 1 नोव्हेंबर 2025 या कालावधीमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मा.आमदार रवींद्र फाटक, शिवसेना सचिव राम रेपाळे, मा.नगरसेवक घनश्याम कणसे यांचे मार्गदर्शनाखाली मंडळाचे अध्यक्ष विजय पडवळ यांचे वतीने सेठ बबनराव पडवळ विद्यालय समोरील पटांगण, पडवळ नगर, वागळे इस्टेट, ठाणे येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. विज्ञान आणि आध्यात्माची सांगड घालत मेडिटेशनसाठी कीर्तन, प्रवचन, पारायण, सत्संग, ध्यान, धारणा या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. भविष्यातीत तरुण हा अर्धा तुकोबा असावा तर अर्धा शिवबा असावा. म्हणजे त्याला भक्तीही कळाली पाहिजे आणि शक्तीही कळाली पाहिजे. शक्तीला जर भक्तीची जोड मिळाली तर महाराष्ट्रातील तरुण एक वेगळा असू शकतो. हि तेजस्विता मावळ्यांकडे होती, शिवाजी महाराजांकडे होती कारण त्यांना तुकोबांची संगत होती. म्हणून आमचा युवक अर्धा तुकोबा आणि अर्धा शिवबा असला पाहिजे. त्यामध्ये भक्ती आणि शक्तीचा समुच्चय असला पाहिजे.

सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रमामध्ये पहाटे 4 ते 6 काकडा भजन, दुपारी 3 ते 5 महिला भजन, सायंकाळी 4 ते 6 हरिपाठ, 6 ते 7 प्रवचन, रात्री 8 ते 10 हरिकीर्तन, 10 ते पहाटे 4 जागर आयोजन करण्यात आले आहे. तर या अखंड हरिनाम सप्ताहातील ज्ञानामृताचा परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष विजय पडवळ यांनी केले आहे.



**ह.भ.प. हरिदास महाराज पालवे शास्त्री म्हणाले की 21 व्या शतकामध्ये जीवन जगण्यासाठी मेडीसिन जेवढे महत्वाचे आहे तेवढेच मेडिटेशन पण महत्त्वाचे आहे.**




**मेष**
मित्रांसोबत रेस्टॉरंटमध्ये जाल, तिथे आनंदाचे वातावरण असेल. ऑफिसमध्ये काही समस्यांमुळे मूड खराब होऊ शकतो, शक्य तितके सामान्य रहा.

**वृषभ**
प्राध्यापकांसाठी दिवस लाभदायक राहील. पुढे जाण्याची संधी मिळेल. पालक मुलांच्या उज्वल भविष्याचा विचार करू शकतात. वैवाहिक जीवन उत्तम राहील.

**मिथुन**
ठरवलेल्या कामात तुम्हाला नक्कीच यश मिळेल. या राशीच्या लोकांनी गरजेपेक्षा जास्त कोणावरही विश्वास ठेवू नये. आज तुमचे आरोग्य चांगले राहील.

**कर्क**
स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी त्यांच्या गंतव्यस्थानापर्यंत पोहोचण्यात यशस्वी होतील. तुम्ही सामाजिक क्षेत्राशी संबंधित आहात, सन्मान होईल.

**सिंह**
कायदा करणाऱ्या विद्यार्थ्यांना नवीन विषयात खूप रस मिळेल.वैवाहिक नात्यात सुरू असलेल्या कलहातून तुम्हाला आराम मिळेल. नात्यात गोडवा येईल.

**कन्या**
स्पर्धेच्या तयारीत यश मिळेल. तुमचा सराव सुरू ठेवा. या राशीच्या महिलांसाठी आज चांगल्या संधी निर्माण होत आहेत ज्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा आहे.

**तूळ**
तुम्ही दिवसभर उत्साही राहाल हार्डवेअर व्यावसायिकांसाठी दिवस लाभदायक ठरेल. तुम्हाला तुमच्या प्रियकराकडून सरप्राईज मिळेल.

**वृश्चिक**
डोळ्यांच्या समस्यांनी त्रस्त असलेल्यांनी चांगल्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. मुलांकडून काही चांगली बातमी मिळू शकते. वैवाहिक जीवन आनंदाने भरलेले असेल.

**धनु**
बांधकाम व्यावसायिकांची सुरू असलेली कामे पूर्ण होतील. मुलाकडून तुम्हाला आनंद मिळेल. आरोग्य चांगले राहील.आजूबाजूच्या लोकांशी सौहार्द ठेवा.

**मकर**
मसालेयुक्त पदार्थ टाळल्यास आरोग्य चांगले राहील. जोडीदारासोबतचे गैरसमज दूर होतील.आर्थिक स्थिती मजबूत होईल.व्यवसायात पुढे जाणे योग्य राहील.

**कुंभ**
तुमच्या नात्यात गोडवा वाढेल. विद्यार्थी वर्गमित्रांच्या मदतीने आपली पूर्वीची प्रलंबित कामे पूर्ण करतील, नोकरीच्या ठिकाणी पुढे जाल.

**मीन**
धार्मिक कार्याकडे तुमचा कल राहील. इतरांना मदत करण्यात रस वाढेल. जर तुम्ही कोणाकडून पैसे घेतले असतील तर तुम्ही ते लवकरच परत कराल.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in


नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# मालवणीचा ठसका जगभर पोहोचविणाऱ्या प्रतिभावंताला मुकलो



### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वस्त्रहरणकार ज्येष्ठ नाटककार गंगाराम गवाणकर यांना श्रद्धांजली

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मालवणी बोलीचा गोडवा आणि ठसका जगभर पोहोचविणारा, कोकणातील बहुमुखी प्रतिभावंत अशा साहित्यिक, नाटककाराला आपण मुकलो आहोत, अशा शब्दांत ज्येष्ठ नाटककार गंगाराम गवाणकर यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

'वस्त्रहरण या विक्रमी नाटकासह, इतर नाट्यकृतींच्या माध्यमातून मराठी रंगभूमीसाठीचे स्वर्गीय गवाणकर यांचे योगदान सदैव स्मरणात ठेवले जाईल, असेही मुख्यमंत्री यांनी म्हटले आहे.

'अभिजात मराठीचे सौंदर्य आणि सौष्ठव मालवणी बोली आणखी ठसठशीतपणे मांडते. अशा या मालवणीची नादमाधुर्यता आणि तिचा ठसका स्वर्गीय गवाणकर यांनी आपल्या नाट्यकृतींतून जगभर पोहोचविला. त्यांच्या इतर नाट्यकृती देखील वेगळ्या धाटणीच्या आणि आशयघन राहिल्या आहेत. पौराणिक ढाच्यातील 'वस्त्रहरण' वर्तमानातील चपखल संदर्भ घेत आजही महाविक्रमी वाटचाल करीत आहे, ही त्यांच्या लेखनाची ताकद राहीली. त्यांच्या निधनामुळे मराठी रंगभूमी, कला-साहित्य क्षेत्रात पोकळी निर्माण झाली आहे. गवाणकर कुटुंबीय, मराठी रंगभूमी चळवळ, त्यांच्या चाहत्यांवर दुःखाचा आघात झाला आहे. आम्ही या सर्वांच्या दुःखात सहभागी असून, त्यांना हा आघात सहन करण्याची क्षमता मिळावी अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो आणि ज्येष्ठ साहित्यिक, नाटककार गंगाराम गवाणकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोकसंदेशात म्हटले आहे.

# नवी मुंबई महानगरपालिकेचा भरघोस मालमत्ताकर वसूल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या एप्रिल ते ऑक्टोबर या पहिल्या सात महिन्यांत तब्बल ५०० कोटींपेक्षा अधिक कर संकलन करून लक्षणीय कामगिरी केली आहे. कर संकलनातील ही झेप लोकाभिमुख उपक्रम, डिजिटल पेमेंट्सला दिलेले प्रोत्साहन तसेच करदात्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी राबविण्यात आलेल्या विविध जनजागृती मोहिमांमुळे तसेच नागरिकांच्या सहकार्यामुळे शक्य झाले असल्याचे महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे सांगितले आहे. नवी मुंबई महानगरपालिका पारदर्शक आणि कार्यक्षम कारभारासाठी कटिबद्ध असून, या उत्पन्नाचा उपयोग शहराच्या विकास कामांसाठी केला जाणार आहे असे सांगतानाच आयुक्तांनी करदात्या नागरिकांचे आभार मानले आहेत.

मालमत्ताकर विभागाच्या या यशामागे नागरिकांचा सहभागासोबतच तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि नियोजनबद्ध धोरणे महत्त्वाची ठरली असून या उपाययोजनांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला असल्याचे अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार व डॉ.राहुल गेठे यांनी सांगितले. उर्वरित पाच महिन्याच्या कालावधीमध्ये कर वसूलीचे निश्चित केलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आयुक्त महोदयांच्या मार्गदर्शनानुसार योग्य नियोजन करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल असे मालमत्ताकर विभागाचे उप आयुक्त डॉ.अमोल पालवे यांनी सांगितले.

*कर संकलनाच्या वाढीसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम*

कर संकलनात वाढ होण्यासाठी महानगरपालिकेने यंदा डेटा विश्लेषणावर आधारित नाविन्यपूर्ण पध्दतीने कार्यवाही करण्याचे नियोजन केले होते. त्यानुसार आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये करसंकलनात वाढ साध्य करण्यासाठी डेटा विश्लेषण,




मालमत्ताधारकांची माहिती अद्ययावत करणे आणि जनजागृती मोहिमा राबविण्यात आल्या. या अंतर्गत माहितीचे सखोल विश्लेषण, कर संकलन मोहिमेचे धोरणात्मक नियोजन आणि माहिती संकलनासाठी विकसित केलेले मोबाईल ॲप्लिकेशन अशा सर्व घटकांच्या माध्यमातून करसंकलनात लक्षणीय वाढ झाली. याचा परिणाम म्हणजे, आत्तापर्यंतच्या इतिहासात पहिल्यांदाच एका आर्थिक वर्षातील पहिल्या सात महिन्यांत ५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त कर संकलन झाले आहे, असे मालमत्ताकर विभागाने स्पष्ट केले.

ऑनलाईन कर भरण्यास नागरिकांकडून प्राधान्य

नागरिकांना घरबसल्या मालमत्ता कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विभागाने डिजिटल पेमेंट पद्धतींचा प्रचार आणि प्रसार अधिक प्रभावीपणे केला. व्हॉट्सॲप चॅटबॉट (८२९११९२०५०४), 'My NMMC – माझी नवी मुंबई' ॲप, महानगरपालिकेची www.nmmc.gov.in ही अधिकृत वेबसाईट, कर देयकांवरील क्यूआर कोड (QR Code) स्कॅनिंग तसेच विविध युपीआय माध्यमांद्वारे पेमेंट करण्याची सुविधा - यांसारख्या ऑनलाईन पर्यायांचा नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर वापर केला. ऑनलाईन करभरणा माध्यमातून रू.३१३ कोटी ७० लाख इतक्या मोठ्या प्रमाणात कर संकलन झाले.

आगामी काळात थकबाकीदारांना मालमत्ताकर भरण्याच्या प्रवाहामध्ये आणण्यासाठी महानगरपालिकेने आता मालमत्ता जप्तीची मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार थकबाकीदारांनी

### डिजिटल पेमेंट्स सुविधा आणि जनजागृती मोहीमेमुळे कर संकलनात लक्षणीय वाढ - आयुक्त डॉ. कैलास शिंदे

मालमत्ता कर भरून थकबाकीची कटू कारवाई टाळावी, असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे.

असा वसूल झाला मालमत्ता कर !

* नमुंमपाच्या आठ विभागांतील १ लाख ६३ हजार २३ मालमत्ताधारकांकडून ५०० कोटी ११ लाख रुपयांचे कर संकलन झाले.
* सर्वात जास्त मालमत्ता कर नेरूळ विभागातून जमा झाला : १०६ कोटी ७९ लाख रुपये
* ऑनलाईन माध्यमांतून झालेले कर संकलन : ३१३ कोटी ७० लाख रुपये
* ऑफलाईन माध्यमांतून झालेले कर संकलन : १८६ कोटी ४१ लाख रुपये

मालमत्तेच्या प्रकारानुसार झालेले कर संकलन

* निवासी मालमत्ता : ३५ टक्के
* अनिवासी / व्यावसायिक मालमत्ता : २३.८४ टक्के
* औद्योगिक मालमत्ता : ३२.४५ टक्के
* मिश्र व इतर मालमत्ता : ८.७१ टक्के

नवी मुंबई महानगरपालिकेचे उद्दिष्ट केवळ कर संकलनात वाढ करणे नाही, तर नागरिकांना तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिक सोयीस्कर व सुलभ सेवा उपलब्ध करून देणे हे आहे. भविष्यात स्मार्ट सिटी संकल्पनेशी सुसंगत असे अधिक डिजिटल उपक्रम राबविण्याचे नियोजन केले असून ज्यायोगे नागरिकांचा वेळ वाचेल आणि कामकाज अधिक पारदर्शक बनेल. करसंकलनातील हे यश केवळ महानगरपालिकेचे नाही, तर प्रत्येक जबाबदार करदात्याचे आहे. नागरिकांनी वेळेवर कर भरून दाखवलेली जबाबदारीची जाणीव आणि विश्वास समाधानकारक असून शहर विकासाला हातभार लावणारा असल्याचे मत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी व्यक्त केले आहे.

# माथेरानमध्ये ई रिक्षा सुरु करा

## - पर्यटनमंत्री शंभूराज देसाई



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड** : माथेरान येथील पर्यटन विषयक पायाभूत सुविधांची कामे स्थानिक प्रशासनाने गतीने करावीत. मा.सर्वोच्च न्यायालयाने माथेरान येथे ई- रिक्षा सुरू करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार माथेरान येथे पर्यटन वाढीच्या दृष्टीकोनातून ई-रिक्षा सुरू करण्यासाठीची कार्यवाही गतीने करण्याच्या सूचना पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी दिल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे माथेरान येथील पर्यटन विषयक पायाभूत सुविधा व माथेरान मधील स्थानिक समस्याबाबत आयोजित आढावा बैठकीत पर्यटनमंत्री शंभूराज देसाई बोलत होते. बैठकीला आमदार महेंद्र थोरवे, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव डॉ.अतुल पाटणे, कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी, पर्यटन संचालक डॉ. बी. एन. पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे, दूरदृश्यप्रणालीव्दारे रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, श्रमिक रिक्षा चालकमालक संघटना माथेरानचे सचिव सुनिल शिंदे, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे यासह इतर संबधित अधिकारी उपस्थित होते.

पर्यटनमंत्री शंभूराज देसाई म्हणाले की,माथेरान हे पर्यटनदृष्ट्या महत्वाचे असलेले शहर आहे. येथे पर्यटनासाठी दरवर्षी मोठ्या प्रमाणात लाखो पर्यटक भेटी देत असतात हे लक्षात घेता येथील स्थानिक पर्यटन विषयक महत्वाच्या असलेल्या पायाभूत सुविधांची कामे गतीने करण्यात यावीत. वाहनतळासाठी आरक्षित असलेला भूखंड विनामोबदला माथेरान नगरपरिषदेकडे हस्तांतरित करण्याकरिता महाराष्ट्र रस्ते विकास प्राधिकरणाने कार्यवाही करावी तसेच या ठिकाणी असलेली अतिक्रमणे त्वरीत हटवण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. माथेरान पर्यावरण संवेदनशील सनियंत्रण समितीने ऑफलाईनही बैठक आयोजित करावी, अशा सूचना यावेळी त्यांनी केल्या.

# राष्ट्रीय सेवा योजना विभागाची आदिवासी पाड्यात दीपावली साजरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

जीवनदीप महाविद्यालयात सक्रिय असणारा राष्ट्रीय सेवा योजना विभाग याने दीपावली सणा निमित्त दिनांक २४- १०- २०२५ रोजी बापसई गावातील आदिवासी पाड्यात तेथील आदिवासी बांधवांसोबत व चिमुकल्यांना सोबत दीपावली उत्सव साजरा केला. यामध्ये तेथील नागरिकांना व चिमुकल्यांना दिवाळीचा फराळ देत दिवाळी उत्सव साजरा केला. यावेळी तेथील चिमुकलांच्या चेहऱ्यावर आनंद खुलून आला. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या या कामगिरीचे संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे ,सचिव. मा. सौ. स्मिता घोडविंदे, संचालक. प्रशांत घोडविंदे, डायरेक्टर. डॉ.के. बी. कोरे प्राचार्य. डॉ.अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, NSS कार्यक्रम अधिकारी दिनेश धनगर, प्रा. धनश्री नाईक NSS स्वयंसेवक या सर्वांचे सहकार्य व मार्गदर्शन या कार्यक्रमात लाभले.



आदिवासी बांधवांसोबत व चिमुकल्यांसोबत दीपावली उत्सव साजरा

# रायफल शूटिंग स्पर्धेत जीवनदीपच्या विद्यार्थ्यांची सुवर्ण कामगिरी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनात अभ्यासाबरोबरच त्यांच्या क्रीडा कलागुणांना प्रोत्साहन देणे हे जीवनदीप संस्थेचे विद्यार्थ्यांच्या प्रती त्यांची गुणवत्ता वाढवण्याचे सूत्र आहे . दिनांक २५ व २६- १०- २०२५ रोजी डी. बी. जाधव ग्रुप ओपन बेंचरेस्ट शूटिंग स्पर्धा ही डी .बी.जाधव स्कूल नांदकर भिवंडी येथे ;अकॅडमी ऑफ टार्गेट स्पोर्ट्स (कल्याण) यांच्यामार्फत आयोजित केलेल्या रायफल शूटिंग स्पर्धेत जीवनदीप महाविद्यालय गोवेली कनिष्ठ व वरिष्ठ या दोन्ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लक्षणीय कामगिरी केली आहे. यामध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील विशाखा तरे(M .A भूगोल) सुवर्ण १५९ , दिपाली तरे(तृतीय वर्ष वाणिज्य)१७८ गोल्ड, संकेत पाटील (प्रथम वर्ष आयटी) १८७ ब्राँझ, गौरव जाधव सिल्वर १९९ (बारावी विज्ञान)या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत लक्षणीय कामगिरी करत जीवनदीप महाविद्यालयाचे नाव मोठे केले आहे .या विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे कौतुक जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे , संचालक प्रशांत घोडविंदे ,प्राचार्य .डॉ.अशोक वाघ , कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य. प्रकाश रोहणे ,उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, जिमखाना प्रमुख. मोहनीश देशमुख, प्रशिक्षक. राम बरण यांनी या विजय विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. व त्यांना पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या या कामगिरीचे त्यांच्या नातेवाईक मित्र परिवाराकडून कौतुक होत आहे.

# कल्याण डोंबिवलीत काँग्रेसला धक्का

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत माजी नगरसेवकांचा शिवसेनेत प्रवेश



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली मध्ये काँग्रेस पक्षाला आणखी एक धक्का बसला आहे. कल्याण डोंबिवली महानगर पालिकेतील डोंबिवली प्रभाग क्र ७३, शेलार नाका च्या नगरसेविका दर्शना शेलार व त्यांचे वडील तथा काँग्रेस डोंबिवली शहर ए ब्लॉक अध्यक्ष व माजी नगरसेवक सदाशिव शेलार यांनी काँग्रेस पक्ष सहकाऱ्यांसोबत आज मुंबई मुक्तागिरी येथे खासदार डॉ श्रीकांत शिंदे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना प्रमुख नेते तथा उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते पक्ष प्रवेश केला. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, कल्याण ग्रामीण आमदार राजेश मोरे, शिवसेना उपजिल्हा प्रमुख राजेश कदम, डोंबिवली उपशहर प्रमुख गोरखनाथ म्हात्रे, युवासेना शहर प्रमुख सागर जेधे आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

शिवसेना मुख्यनेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना आता अधिक मजबूत होत असून राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील मोठ्या संख्येने नागरिक संघटनेशी जोडले जात आहेत. उपमुख्यमंत्री यांच्या विकासाभिमुख कार्यप्रणालीने प्रभावित होऊन विविध पक्षातील लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, पदाधिकारी शिवसेनेशी जोडले जात आहेत.

याच पार्श्वभूमीवर आज उपमुख्यमंत्री यांच्या मुख्य उपस्थितीत काँग्रेसचे डोंबिवली शहर पूर्व विभाग ए ब्लॉकचे अध्यक्ष, माजी नगरसेवक सदाशिव शेलार, काँग्रेसच्या माजी नगरसेविका दर्शना शेलार यांनी आज शिवसेनेत जाहीर प्रवेश करत हाती भगवा घेतला. यांच्यासह अजय शेलार, हिरामण मोरे, दशरथ म्हात्रे, प्रतीक शेलार, पुण्यदान सरोदे, राहुल पढाडे, मोहन भोसले, ख्वाजा शेख, सलील चौधरी, प्रसाद कीर, विशाल म्हात्रे आणि मोठ्या संख्येने काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी सर्वांचे पक्षात स्वागत करून पुढील राजकीय आणि सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# रामवाडी पुलावर पथदिवे

## जीवन पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : मुंबई गोवा महामार्ग (NH-66) वरील रामवाडी ब्रिज परिसरातील रस्त्यावरील गेल्या तीन महिन्यांपासून पेणहून रामवाडी दिशेच्या डाव्या बाजूच्या सर्व्हिस रोड व रामवाडी ब्रिज परिसरात रस्त्यावरील दिवे बंद असल्यामुळे त्या भागात पूर्ण अंधार होता.या अंधारामुळे प्रवाशांना रात्री प्रवास करताना मोठा अपघाताचा धोका, स्थानिकांना असुविधा, तसेच गणेशोत्सवाच्या काळातही समस्या निर्माण झाली होती. या संदर्भात शिक्षक सोसायटी पेण येथील सामाजिक कार्यकर्ते इंजिनिअर जीवन शंकर पाटील यांनी 23 ऑक्टोबर रोजी ई-मेलद्वारे व 24 ऑक्टोबर रोजी ट्विटर (X) द्वारे माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी साहेब व



मुख्यमंत्री कार्यालयात तसेच NHAI यांच्यापर्यंत हा विषय पोहोचवण्यात आला होता. आज 28 ऑक्टोबर 2025 रोजी, संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून मुंबई गोवा महामार्गावरील दिवे सुरू करण्यात आल्याने सगळीकडे काळोख होता तो प्रकाशमय भाग झाल्याने प्रवाशांच्या चेहऱ्यावर आनंद पहावयास मिळाला याबद्दल मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो अशी प्रतिक्रिया इंजिनिअर जीवन शंकर पाटील यांनी दिली.

त्यांनी असेही सांगितले की हा विषय तीन महिने दुर्लक्षीत राहणे हेही तितकेच चिंताजनक आहे.कारण सार्वजनिक सुरक्षेसाठी आवश्यक अशा मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होऊ नये.तसेच ही समस्या पुन्हा उद्भवू नये यासाठी नियमित तपासणी व देखभाल आवश्यक असल्याचेही सांगितले व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच शासनाचे तात्काळ लक्ष व कार्यवाही बद्दल मनःपूर्वक आभार.आम्ही पुढेही सार्वजनिक सुविधा व सुरक्षिततेसाठी सजगपणे प्रयत्न करत राहू असेही इंजिनिअर जीवन शंकर पाटील यांनी सांगितले.

## निसर्गसुंदर थळ सामाजिक संस्थेची

# दुर्ग बांधणी स्पर्धा संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड** : परंपरा, संस्कृती आणि शिवचरित्राचा गौरव जपण्याच्या उद्देशाने निसर्गसुंदर थळ सामाजिक संस्था आयोजित तिसरी दुर्ग बांधणी स्पर्धा-2025 थळ येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या स्पर्धेत बालस्पर्धकांनी आपल्या कल्पकतेतून व ऐतिहासिक जाणिवेतून विविध प्रकारचे देखणे, आकर्षक व सूक्ष्म बारकाव्यांनी सजलेले दुर्ग साकारले. स्पर्धेतील दुर्गांची मांडणी व बांधणी पाहताना जणू हिंदवी स्वराज्याचे प्रमुख दुर्गकार पू. हिरोजी इंदुलकर यांच्या हस्त कौशल्याचे प्रतिबिंब



प्रत्येक बालस्पर्धकात दिसून आले. बालस्पर्धकांची माहितीची सखोल तयारी, परंपरेशी असलेले नाते आणि कलात्मक बांधणी यांचे परीक्षक मंडळाने विशेष कौतुक केले.या स्पर्धेचे परीक्षण करण्यासाठी अलिबाग येथील सुप्रसिद्ध वकील व गिर्यारोहक ॲड. भूषण जंजिरकर, वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ.नितीन गांधी, इतिहास व मराठा आरमाराचे अभ्यासक योगीराज सप्रे हे मान्यवर परीक्षक म्हणून उपस्थित राहिले.

संस्थेच्यावतीने नीरज रानडे यांनी परीक्षकांचे मनःपूर्वक आभार मानले. स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी परिश्रम घेतलेल्या संस्थेचे सर्व पदाधिकारी, स्वयंसेवक व सदस्य यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. या स्पर्धेचा भव्य बक्षीस वितरण समारंभ दि. 05 नोव्हेंबर 2025 रोजी श्री गणेश मंदिर, थळ आगर येथे आयोजित करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, या स्पर्धेदरम्यान "अमृत दुर्गोत्सव" या राज्यस्तरीय उपक्रमाची माहिती संस्थेला देण्यात आली असून, निसर्गसुंदर थळ सामाजिक संस्था पुढील काळात या उपक्रमाची थळ परिसरात अंमलबजावणी करण्याचा मानस बाळगते. यामधून स्थानिक पातळीवर दुर्गसंवर्धन, इतिहासजाण आणि स्वराज्य संस्कार यांचा प्रसार होण्यास चालना मिळणार आहे. संस्थेचे अध्यक्ष ॲड.अवधूत सप्रे यांनी स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांचे तसेच पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि समाजहितार्थ उपक्रम राबविण्याच्या संस्थेच्या कटिबद्धतेची पुनरुज्जीवित घोषणा केली.



ठाणे ◆ बुधवार
२९ ऑक्टोबर २०२५
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पान ४

# केंद्र सरकारकडून ८ व्या वेतन आयोगाला मंजूरी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

नवी दिल्ली : केंद्र सरकारने आज 8 व्या केंद्रीय वेतन आयोगाला (8th Central Pay Commission) अधिकृतपणे मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे सुमारे 50 लाख केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांसोबतच, संरक्षण सेवांमधील कर्मचारी आणि जवळपास 69 लाख पेन्शन घेणाऱ्या लोकांनाही मोठा फायदा मिळणार आहे. त्यांच्या पगारात आणि पेन्शनमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.

केंद्रीय कर्मचाऱ्यांचे पगार, पेन्शन आणि इतर सुविधा दर दहा वर्षांनी बदलण्यासाठी असे वेतन आयोग नेमले जातात. या प्रथेनुसार, 8 व्या वेतन आयोगाच्या शिफारसी 1 जानेवारी 2026 पासून लागू होण्याची अपेक्षा आहे. न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यांची आठव्या वेतन आयोगाच्या अध्यक्ष म्हणून, तर आयआयएम बंगळूरचे प्राध्यापक पुलक घोष आणि पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे सचिव पंकज जैन यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आयोगाला गरज वाटल्यास, अंतिम शिफारशी तयार होताच, मधले अहवाल सादर करण्याची मुभा असेल.

आयोग शिफारशी करताना देशाची आर्थिक परिस्थिती आणि वित्तीय शिस्तीची गरज लक्षात घेईल. मागील, म्हणजे 7 व्या वेतन आयोगामुळे 2016-17 मध्ये 1.02 लाख कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडला होता.

# ठाणे महापालिकेतर्फे लोकशाही दिन संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** नागरिकांच्या वैयक्तिक तक्रारींचा निपटारा तातडीने होण्यासाठी तालुकास्तरिय लोकशाही दिनाच्या धर्तीवर, ठाणे महानगरपालिकेच्यावतीने दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी परिमंडळ स्तरावरही लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार, सोमवार, १७ नोव्हेंबर, २०२५ रोजी परिमंडळ लोकशाही दिन होणार आहे. या लोकशाही दिनासाठी नागरिकांनी आपली निवेदने ३ नोव्हेंबरपर्यंत सादर करण्याचे आवाहन ठाणे महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. नागरिकांनी प्रथमतः परिमंडळ लोकशाही दिनात अर्ज दाखल करावेत. परिमंडळ लोकशाही दिनात दाखल केलेल्या तक्रारींवर कोणतीही कार्यवाही झाली नसल्यास नागरिक महापालिका लोकशाही दिनामध्ये नियमानुसार १५ दिवस आधी आपली निवेदने सादर करू शकतील.

नागरिकांनी परिमंडळ लोकशाही दिनासाठी आपली निवेदने संबंधित परिमंडळ कार्यालयात सादर करावीत.

**नागरिकांनी आपली निवेदने पुढील ठिकाणी सादर करावीत.**
**परिमंडळ १ - (कळवा, मुंब्रा, दिवा प्रभाग समिती अंतर्गत) उपायुक्त कार्यालय, कळवा प्रभाग समिती कार्यालय, कळवा**
**परिमंडळ २ - (नौपाडा, वागळे प्रभाग समिती अंतर्गत, उपायुक्त कार्यालय, नौपाडा प्रभाग समिती कार्यालय, ठाणे (प.)**
**परिमंडळ ३ - (उथळसर, वर्तकनगर, लोकमान्य. सावरकरनगर, माजिवडा मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत) उपायुक्त कार्यालय, माजिवडा मानपाडा प्रभाग समिती कार्यालय, ठाणे (प.)**


# वैश्य समाज संघाच्या संस्कार शिबिराला प्रारंभ



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाशिंद :** ठाणे पालघर जिल्हा वैश्य समाज संघाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी संस्कार शिबिर आयोजित करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष निलेश गंधे यांनी दिली. या संस्कार शिबिरात योगासन,हॉर्स रायडिंग, गन ऑपरेटिंग, विविध प्रकारचे खेळ, रात्रीच्या वेळची शेकोटीचा कार्यक्रमात जिल्हा संघातील वैश्य समाजातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्याचे दिसून आले . यामुळे मुलांमधील कलागुणांना वाव मिळावा हा एकमेव हेतू समोर ठेवून जिल्हा संघ स्तुत्य उपक्रम राबवित आहे असी माहिती संस्कार समितीचे सभापती साई दलाल यांनी दिली. या वर्षी पडणा-या पावसाचा आनंद घेत शिबिरातील दिनचर्या सुरळीत पार पडत आहे. या शिबीरासाठी अध्यक्ष निलेश गंधे, समन्वय समीती प्रमुख दिलीप भोपतराव, विश्वस्थ प्रमुख सवित्री आंबवणे, उ उपाध्यक्ष प्रीयेश जगे, उपाध्यक्ष निलेश कोंडलेकर, जिल्हा स्रिप्रतिनिधी पुजा काबाडी, चद्रशेकर दलाल, जयंत सोनटक्के,सचिव महेश गुजरे, सहचिटनिस पंकज मधुकर जगे ,संस्कार समिती सभापती साई दलाल, सदय दिपक जगे, रीध्दी तेलवणे, जौती चौधरी, निविदिता हरदार, त्रृप्ती चौधरी, अश्वीनी काबाडी, सुहाज पुन्यार्थी, अमित चौधरी,या शिबिरात घोडेस्वारीचे प्रशिक्षण नंदकुमार दलाल तर रायफल शुटींग राजा भुसारी यांनी दिले. डा. मिलीन तेलवणे यांनी विद्यार्थीची आरोग्य तपासणी केली.

# ओम शिवम सत्संग ट्रस्ट परिवाराची गोसेवा



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** ओम शिवम सत्संग ट्रस्ट गोसेवा परिवाराची ऑक्टोबरमधील सेवा डॉ. विजय पंडित यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण झाली. कल्याणमधील विविध समुदायातील मित्रांना एकत्र करून आणि त्यांच्यामार्फत दर महिन्याला थोड्याफार रकमेची रक्कम गोळा करून, गोसेवा परिवार दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी टिटवाळा येथील गुरवली गावातील गोशाळेत सेवा करण्यासाठी जातो.

३ हजार रुपयांपासून सुरू झालेली ही गोसेवा आता मासिक २१ हजारांची सेवा बनली आहे. या ऑक्टोबरमध्ये २१ हजार किमतीचा भुसा, कोंडा, पेंढा आणि दगड देण्यात आला. गोशाळेचे संचालक हरिओम महाराज यांनी गायी आणि गुरांसाठी लापशी देखील तयार केली होती, जी गोशाळेतील सर्व गोसेवकांना वाटण्यात आली. या सेवेचे बिल हे गोसेवा परिवाराचे सचिन गोरे आणि मनोज तिवारी यांच्या सौजन्याने देण्यात आले. या प्रसंगी, गोसेवा कुटुंबातील सर्व लोकांनी गोशाळेत चणाडाळ-गूळ, हिरव्या भाज्या, काकडी आणि पालक इत्यादींचे वाटप केले.

# परतीच्या पावसानं शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी!

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड :** मुरबाड तालुका हा ९०% भातशेतीवर अवलंबून आहेत.शेती हा ग्रामिण भागाचा आर्थिक कणा आहे. भात पिकावरच बँका कर्ज देतात व ह्या एकमेव पिकावर वर्षाचं अन्नधान्य साठवणूक केली जाते.प्रांपचिक गरजा असोत की मुलामुलीची लग्नकार्य हे केवळ आणी केवळ शेती उत्पादनातून चालते. मुरबाड तालुक्याला भाताचं कोठार म्हणून ओळखल जातंय. तर एके काळी उत्तम तांदूळ म्हणून " मुरबाडी झिनी" या धान्याच महाराष्टभर नाव होत. या वर्षी उत्तम पाऊस पडल्याने शेतकरी सुखावला होता परंतु लहरी निसर्गाने मोक्याच्या वेळेस दणका दिला आणी तयार झालेल्या पिका सोबत शेतकऱ्यांला देखील अडवा केला आहे.भातपिक तयार झाले कापणी करून खळयात येण्या आधी दिपावळीच्या आनंदात शेतकरी असताना



परतीच्या पावसाने गेल्या हप्ताभर धुमाकूळ घातल्याने ऊभी पिक आडवी झाल्याने भाताच्या लोंब्या पाण्यात पडून काही कूजून गेल्या तर काही भाताला मोड आल्याने हाता तोंडाशी आलेल धान्य डोळ्या देखत नाहिसे झाल्याचे पहावयाची वेळ येऊन ठेपली आहे. हे भात भिजल्याने काळा पडलेला भात व्यापारी खरेदी करीत नाहीत तर काळा पडलेला दाणा खाण्यालायक राहात नाही त्यातच भाताची पेंढी कुजून गेल्याने त्यांना ही तबेलेवाले व्यापारी घेणार नाहीत किंवा घरच्या गुरांना चारा म्हणून उपयोगात येणार नाही.परतीच्या पावसाने शेतकरी उद्ध्वस्त झाला असला तरी त्याला न्याय देण्यासाठी तो संघटित नाही व नेते, पुढारी, सरकार यांना त्याच्या सुखदुखाच सोयर सुतक नाही. शेतक-याच्या बांधावर जाण्यासाठी कोणाला वेळ नाही शेतकरी जगाचा पोंशिदा असला तरी निसर्गा पुढे हातबळ ठरला आहे.

## धान्य घरात येण्या आधीच शेतातच कुजले!

**परतीच्या पावसाचा फटका तालुक्यातील भात पिकाला बसला असल्याने मुरबाड महसूल विभाग व कृषी विभागाकडून तात्काळ सरसकट पंचनाने सुरू करण्याचे आदेश दिले गेले असून तात्काळ तसा अहवाल शासनाला सादर करून शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाई मिळेल व कोणीही वंचित राहणार नाही.**
**- अभिजित देशमुख, तहसिलदार मुरबाड**

**शेती ही ग्रामीण भागाचा आर्थिक कणा आहे.शेतकऱ्यांचे धान्य दिवाळी नंतर घरात येण्याऐवजी शेतात कुजून गेला आहे. हे अस्मानी संकट आहे. बळीराजा पुर्णता संकटात सापडला असून वर्षभराची मेहनत, खर्च मातीमोळ झाला असल्याने सरकाने ओळा दुष्काळ जाहीर करावा.**
**- विजय भोईर, शेतकरी सोनावळे**



**मुरबाड तालुक्याला भाताचं कोठार म्हणून ओळखल जातंय. तर एके काळी उत्तम तांदूळ म्हणून " मुरबाडी झिनी " या धान्याच महाराष्टभर नाव होत. या वर्षी उत्तम पाऊस पडल्याने व लहरी निसर्गाने मोक्याच्या वेळेस दणका दिला आणी तयार झालेल्या पिका सोबत शेतकऱ्यांला देखील अडवा केला आहे.**

# वाशी खारेपाटातील भात शेती उध्वस्त

## ओला दुष्काळ जाहीर करा : सी.आर. म्हात्रे यांची मागणी






**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** पेण तालुक्यातील वाशी खारेपाटातील भातशेती अक्षरशः १०० टक्के उध्वस्त झाली असून जणू खारे पाट उध्वस्त होण्याचा मार्गावर आहे. वाशी शिर्की विभाग ,हमरापूर विभाग, किनारपट्टी उध्वस्त झाली आहे.आज परशुरामाची भूमी अनाथ होत आहे. परतीच्या सायंकाळच्या या जोरदार वादळी पाऊसाने शेती कायमचीच झोपून गेली आहे.पाणीमय झाली आहे. कापलेली शेती,बांधून ठेवलेले भारे कुजले, कणसे मोड येऊन हिरवी झाली.बळीराजा हतबल झाला,या अगोदर हे घडलेच नव्हते,ते घडत आहे. त्यामुळे वाशी खारेपाटाला ओला दुष्काळ जाहीर करावा असे मागणी अशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सीआर म्हात्रे यांनी केली आहे.

सतत तयार होणाऱ्या कमी दाबाच्या पट्टयाचा फटका किनारपट्टीला बसत आहे.निसर्गाचा प्रकोप मे महिन्यापासून दिसत आहे मात्र त्याने आत्ता रौद्र रूप धारण केले आहे. या प्रकोपापेक्षा वेदनादायक म्हणजे मानवी उदासीनता प्रशासनाची कासव गती,आणि लोकप्रतिनिधींची मौन भूमिका.

**शेतीतील पाणी जाण्याचे नैसर्गिक मार्ग कांदळवन याने गिळंकृत केलेत खाड्या,खैसे,शेवटच्या घटका मोजतात .दलदल,सुपिकता हरवली, आत्ता पुढच्या हंगामाला तोंड देण्याची हिंमत बळीराजात नाही.पण हे सर्व होत असताना घाट माथ्यावर जसे लोकप्रतिनिधी ,पाऊस, चिखल याची तमा. न बाळगता बळीराजासाठी फिरतात तसा एका सुद्धा लोकप्रतिनिधींचा आवाज शेताच्या बांधावर फिरताना दिसत नाही,हीच खरी शोकांतिका अशी खंत ही सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी व्यक्त केली.**

खारेपाटामध्ये ओला दुष्काळ जाहीर करावा,कारण पोटापुरता भात सुद्धा शेतीत राहिला नाही मग वर्षभर खाणार काय?महागडे बियाणे, खते ,जंतुनाशक,भरमसाठ मजुरी यावर मात करून बहरून आलेली शेती संपली.जणू आभाळ फाटलं ,आणि आयुष्य उद्ध्वस्त झालं,हतबल झालेला शेतकरी या अगोदर कधी पहिला नव्हता तो आज दिसत आहे.

सभा होतात,दौरे होतात,यात आश्वासनाची खैरात होते. प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना सुनावले जाते,मात्र पुढे काय करतात त्याचा फीडबॅक घेतला जात नाही हे पण खरे.खरे पाहता लोकप्रतिनिधींनी आपल्याकडील जमा मायाजाल म्हणजे निधी,सत्ता आणि प्रभाव यातील एक टक्का रक्कम जरी खारेपाट विभागातील शेतकऱ्यासाठी वापरला तरी खारेपाट विभाग पुन्हा उभा राहू शकतो.मात्र हे सर्व सभा,बॅनरबाजी ,सोशल मिडिया यावर होत असते प्रत्यक्षात बळीराजा कित्येक वर्ष आहे तिथेच आहे. मात्र बळीराजा जगाला पाहिजे.तरच सत्तेसाठीचे बटण दाबण्यास उत्सुक राहील हे ही लक्षात घेतले पाहिजे.परवा एका वर्तमान पत्रातील बातमी शेतीचे नुकसान झाले नाही अशी दर्शविणारी होती,याला काय म्हणायचे.खारेपाट विभागाला विशेष पॅकेज हवे,तात्काळ पुनर्वसन पॅकेज अशी मागणी ही केली आहे.

शेतीतील पाणी निचऱ्याची कायमची सोय करावी लागेल पुनर्पिकासाठी बियाणे,खते,यासाठीचे तांत्रिक मार्गदर्शन पाहिजे. आपत्ती ग्रस्त शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत दिली पाहिजे.लोकप्रतिनिधींनी आपली मौनी भूमिका बदलून बळीराजासोबत राहायला पाहिजे. आपल्या गावचा ,समाजाचा आवाज ऐकला पाहिजे, खारेपाट विभागातील शेतकऱ्यांच्या डोळयात अश्रू नाहीत,ते रडायला थकले आहेत,पण या वादळापूर्वीच्या शांततेचा अभ्यास झाला पाहिजे,हा कधीही उद्रेक होऊ शकतो.

निसर्गाच्या लाटांना थोपविता येत नाही,पण अन्याय आणि निष्क्रियतेला नक्कीच तोंड देता येते.मात्र येथेही जनतेच्या मानसिकतेची गरज आहे. परतीच्या पावसाने शेती वाहून गेली बळीराजा पुन्हा उभा राहण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न झाले पाहिजे.अशी मागणीही सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी केली आहे.

# रायते येथे उल्हास नदीत दोन तरुण बुडाले



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण तालुका पोलीस स्टेशनच्या हद्दीतील रायते गावाजवळ सोमवारी सायंकाळी छठ पूजेच्या पार्श्वभूमीवर घडलेल्या हृदयद्रावक घटनेत दोन तरुण पाण्यात बुडून बेपत्ता झाले. घटनास्थळी तात्काळ मदतकार्य सुरू करण्यात आले असले, तरी अद्याप त्यांचा शोध लागलेला नाही.

सायंकाळी साडेपाचच्या सुमारास रायते नदीच्या घाटावर छठ पूजेचा विधी सुरू होता. त्या ठिकाणी उपस्थित असताना प्रिन्स गुप्ता (वय 16) आणि राजन विश्वकर्मा (वय 18) हे दोन तरुण नदीकाठी आले. त्याचवेळी एक मुलगा पाय घसरून नदीत पडला. त्याला वाचवण्यासाठी दुसरा मुलगा पुढे सरसावला, मात्र दोघेही पाण्याच्या प्रवाहात सापडून वाहून गेले.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थांनी तत्काळ पोलिसांना आणि अग्निशमन दलाला कळवले. टिटवाळा पोलिसांसह कल्याण तालुका पोलीस, अग्निशमन दल आणि ग्रामस्थांनी रात्री उशिरापर्यंत नदी परिसरात शोधकार्य चालवले. मात्र अंधारामुळे ते काम थांबवावे लागले. मंगळवारी सकाळी पुन्हा सात वाजल्यापासून बचाव पथकांनी शोध मोहीम सुरू केली आहे. शोधकार्यात स्थानिक तरुण, गोताखोर आणि ग्रामपंचायतीचे स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. नदीचा प्रवाह आणि पाण्याची खोली यामुळे शोध मोहिमेत अडथळे येत आहेत.

पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, अद्याप या दोन्ही तरुणांचा काहीही ठावठिकाणा लागलेला नाही. घटनेमुळे रायते गाव तसेच परिसरात शोककळा पसरली असून, छठ सणाचा आनंद क्षणात विरला आहे. ग्रामीण भागात नदीकाठच्या सुरक्षिततेबाबत प्रशासनाने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही स्थानिकांकडून केली जात आहे.

# निवृत्त वेतनधारकांनी 30 नोव्हेंबरपर्यंत हयात प्रमाणपत्र सादर करा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** शासनाच्या ज्या निवृत्ती वेतन धारकांना व कुटुंब निवृत्तीवेतन धारकांना जिल्हा कोषागाराकडून निवृत्त वेतन प्रदान केले जाते. त्या सर्व निवृत्तवेतन धारकांनी व कुटुंब निवृत्त वेतनधारकांनी हयात असल्याबाबतचे प्रमाणपत्र दि.1 नोव्हेंबर ते 30 नोव्हेंबर 2025 या कालावधीत सादर करावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी दिपक बोडके यांनी केले आहे. निवृत्ती वेतनधारकांचे हयात प्रमाणपत्र विहीत मुदतीत कोषागारात प्राप्त झाल्याशिवाय पुढील वेतन प्रदान केले जाऊ शकत नाही.

बँकेमार्फत निवृत्तीवेतन घेणाऱ्या निवृत्ती वेतनधारकांनी कोषागार कार्यालयाकडून संबंधित बँकेकडे पाठविण्यात आलेल्या घोषण पत्रावर स्वत: हयात असल्याबाबत बँक व्यवस्थापक यांच्या समक्ष दिनांकीत स्वाक्षरी करावी. ही घोषणा पत्रे संबंधित बँकांकडे पाठविण्यात आली



आहेत. पुनर्नियुक्त, पुनर्विवाह केलेल्या कुटुंब निवृत्ती वेतन, निवृत्ती वेतनधारकांकरीता नियमित नमुना वापरावा.

मनिऑर्डरद्वारे निवृत्ती वेतन घेणाऱ्या निवृत्ती वेतनधारकांचे हयात दाखल्यांचे नमुने या कोषागारा कार्यालयाकडून संबंधितांच्या पत्यावर पाठविण्यात आले आहेत. त्यांनी स्वत:चे हयात दाखले स्वाक्षरी सहपूर्ण करुन कोषागार कार्यालयाकडे परस्पर पाठविण्याची व्यवस्था करावी. तसेच अधिक माहीतीकरिता रायगड जिल्हा कोषागार कार्यालयाकडे संपर्क साधावा.

# कल्याण डोंबिवलीकरांना सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याणच्या आचार्य अत्रे रंगमंदिरात बुधवार दिनांक 29 ऑक्टोबर रोजी ज्येष्ठ नागरिक महोत्सव आणि दिनांक 30 ऑक्टोबर रोजी महापालिका अधिकारी कर्मचाऱ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण ज्येष्ठ नागरिक दिन व महापालिका वर्धापन दिनाचे औचित्य साधून बुधवार दिनांक 29 ऑक्टोबर सकाळी 10 वाजल्यापासून ज्येष्ठ नागरिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. तर गुरुवार दिनांक 30 ऑक्टोबर रोजी दुपारी 3 वाजल्यापासून महापालिका अधिकारी कर्मचारी वर्गाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे बहारदार सादरीकरण केले जाणार आहे.

यामध्ये दिनांक 29 ऑक्टोबर रोजी महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष अशा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन ज्येष्ठ नागरिकांनी सादर केलेले संगीत, नृत्य व नाट्य सादरीकरण, निवडक हास्य कविता व विडंबन गीते सादरीकरण, आरोग्य विषयक मार्गदर्शन, ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा इ. कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महापालिका क्षेत्रातील ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करणे आणि सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागाची संधी देऊन त्यांचा आनंद वृद्धिंगत करणे, त्यांच्या आनंदी आयुष्यासाठी एक व्यासपीठ निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. दिनांक 30 ऑक्टोबर रोजी क्रीडा व सांस्कृतिक विभागामार्फत महापालिकेच्या अधिकारी कर्मचारी वर्गाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले जाणार आहे.




*Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,*
*Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*
*Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024*